गोवा सरकार

# शेतकी संचालनालय

पणजी-गोवा




# फुलझाडांची लागवड

# अनुक्रमणिका


ॲन्थुरिअम ........ १
गुलछडी ........ २
ग्लॅडीओलस ........ ४
ऑर्किडस् ........ ६
झेंडू ........ ७
अबोली ........ ९

# ॲन्थुरिअम



"कट् फ्लॉवर्स" च्या श्रेणीत सर्वात्कृष्ट टिकाऊपणामुळे ॲन्थुरिअम ही फुले फार लोकप्रिय होत आहेत. भरपूर सापेक्ष आर्द्रता, थोडीशी सावली व २५ ते २८° सें. तापमानात या फुलझाडांची चांगली वाढ होते. झाडावरुन तोडल्यानंतर १५ ते २० दिवस टिकणाऱ्या या विविधरंगी फुलांची लागवड किनारपट्टीच्या प्रदेशात फार चांगल्या प्रकारे करता येते.

**अभिवृध्दी :** पारंपारिक पध्दतीत या फुलझाडांची अभिवृध्दी खोडापासून किंवा कंदापासून करतात. सध्या उती सवंर्धनापासून अभिवृध्दी करण्याकडे जास्त कल दिसून येतो. क्वचित प्रसंगी बीयांचाही पुनरुत्पादनासाठी वापर करण्यात येतो.

**लागवड :** या फुलझाडांच्या लागवडीसाठी भरपूर सेंद्रीय घटक असलेल्या भुसभूशित व पाण्याचा व्यवस्थीत निचरा होणाऱ्या माध्यमाची गरज आहे. यासाठी जाडसर वाळू, कोळसा, नारळाचा भूसा आणि विटांचे लहान तुकडे यांचा वापर करण्यात येतो.

योग्य आकाराच्या मातीच्या कुंड्यावरील माध्यम वापरुन एक चतुर्थांशपर्यंत भरून त्यात रोपांची किंवा कंदाची लागवड करण्यात येते व झाडाच्या वाढीनुसार नवीन माध्यम वापरून उर्वरित भाग भरण्यात येतो. हवेतील आद्रता टिकवण्यासाठी "मायक्रो स्प्रिकलर्स" द्वारा पाणी देणे आवश्यक आहे. जमिनीवर गादी वाफे तयार करून ३०X३० सें. मी. किंवा ४५X४५ सें. मी. अंतरावर वरीलप्रमाणे माध्यम वापरूनही ॲन्थुरिअमची लागवड करता येते. हरितगृहात ही या झाडाची लागवड करून १००० वर्ग मीटर क्षेत्रफळांत ३००० ते ४००० रोपे लावता येतात.

**खताच्या मात्रा :** सर्वसाधारणपणे १० ग्रॅम १५ : १५ : १५ या सारखे संयुक्त दाणेदार खत तीन महिन्यातून एकदा प्रती झाड देण्यात येते. या व्यतिरिक्त ०.५ते–१ टक्का खताच्या


द्रावणाची फवारणी केल्यास फुलांचा दर्जा वाढतो. चुनखडीयुक्त खते आणि कोंबडी खत या पिकासाठी फारच उपयुक्त आहे.

**कीड व रोग :** पानावरील ठिपके व जिवाणुजन्य पर्णरोग या दोन रोगांचा प्रादुर्भाव या पिकांवर होतो. कार्बेंडाझीम १ ग्रॅम १ लिटर पाण्यात मिसळून किंवा डायथेन – झेड – ७८, ३ ग्रॅम १ लिटर पाण्यात मिसळून फवारणी केल्यास या रोगांचा बंदोबस्त होतो. पावसाळ्यात पाणी मुळांशी साचणार नाही याची योग्य ती काळजी घेतल्यास मूळ कुजण्याच्या रोगापासून झाडांचा बचाव होतो. कोळ्याच्या बंदोबस्तासाठी कॅलथॅन किंवा मोनोक्रोटोफॉस या किटकनाशकांचा प्रती लिटर २ मिली या प्रमाणात फवारणी करण्यात येते.

**काढणी व उत्पन्न :** लागवडीनंतर दहाव्या महिन्यात ५ ते ७ पाने तयार झाल्यावर ॲन्थुरीअमची फुले येण्यास सुरवात होते. प्रतीवर्षी ५ ते ८ फुले एका झाडापासून मिळू शकतात. पुष्पदल पूर्णपणे उमलल्यानंतर सकाळच्यावेळी या फुलांची तोडणी करतात. लांब देठ ठेऊन काढलेली फुले सुकू नयेत. म्हणून देठाच्या मुळाकडील भाग पाण्यात बुडवून ठेवण्यात येतो.

# गुलछडी

कंद वर्गातील फुलझाडांपैकी एक महत्वाचे पिक म्हणजे गुलछडी किंवा ''ट्युबरोज'' ज्याचा हार आणि पुष्पगुच्छ करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर होतो. एकेरी आणि दुहेरी पाकळ्यांची ही फुले फार दिवस टिकून राहू शकतात. लागण केल्यानंतर सलग तीन वर्षे या पिकापासून फुलांचे उत्पादन घेता येते.



**हवामान आणि जमिन :** भरपूर सूर्यप्रकाश, उच्च सापेक्ष आर्द्रता आणि ३०° सें. दरमान्यचे तापमान या पिकाला विशेष मानवते. हलक्या, वालुकामय ते भारी जमिनीत या पिकाची लागवड करता येते. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५

या दरम्यान असल्यास पिकाची वाढ चांगली होते. सेंद्रीय घटक भरपूर प्रमाणात असलेल्या जमिनीत झाडे चांगली वाढून फुलांचे उत्पादन जास्त मिळते. बिमट किंवा हरयाळी या सारख्या तणांचा प्रादुर्भाव असलेल्या जमिनीत या पिकाची लागवड करू नये.

**अभिवृध्दी आणि लागवड :** जमिनीची ४५ सें. मी. खोलपर्यंत मशागत करून ३० ते २० सें. मी. अंतरावर ४–५ सें. मी. खोल कंदाची लागवड करण्यात येते. लागवडीआधी गुलछडीचे कंद ताम्रयुक्त बुरशीनाशकाच्या द्रावणात बुडवून घ्यावेत. पाण्याचा व्यवस्थित निचरा होणाऱ्या जमिनीत मे, जून महिन्यात तर अन्य बाबतीत सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये लागवड करता येते. एका जागी एक या प्रमाणात लावल्यास १०,००० कंद एक हजार वर्ग मिटर जमिनीत पुरेसे होतात. तीस ग्रॅम वजनाचे कंद लागवडीनंतर साठ दिवसात तर ४५ ग्रॅम वजनाचे कंद लागवडीनंतर पन्नास दिवसात फुले धारण करतात. फुलांची कापणी केल्यानंतर चार ते पाच आठवड्यात कंद खणून काढून दोन ते तीन आठवडे सावलीत वाळल्यास लागवडीयोग्य बियाणे तयार करता येते.

**खताच्या मात्रा :** जमीन तयार करतेवेळी हेक्टरी २५ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंस्पोस्ट मातीत मिसळणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त १५० कि. नत्र, १५० कि. स्फुरद व १५० कि. पालाश या वर खतांच्या मात्रा रासायनिक खतांच्या रुपांत दिल्यास भरपूर उत्पादन मिळते. यापैकी स्फुरद व पालाश लागवडीच्यावेळी व उर्वरीत नत्र लागवडीनंतर एकेक महिन्याच्या अंतराने तीन हप्त्यात तर खोडवा पिकासाठी चार हप्त्यात विभागून देणे गरजेचे आहे.

**आंतरमशागत :** लागवडीनंतर योग्य ती वाढ झालेल्या पिकांत भरणी केल्यास गुलछडीचे तूरे सरळ वाढण्यास मदत होते. याशिवाय गवत किंवा तत्सम सेंद्रीय पदार्थांचे आच्छादन केल्यास तणाचा बंदोबस्त होतो व जमिनीत ओलावा टिकून राहतो. जमिनीच्या प्रकारानुसार गुलछडीच्या पिकास उन्हाळ्यात तीन दिवसांआड तर हिंवाळ्यात चार ते पाच दिवसांआड पाणी देणे आवश्यक आहे. या पिकावर किड किंवा रोगाचा प्रादुर्भाव सहसा होत नाही.

गुलछडीच्या मुळ पिकाची कापणी झाल्यानंतर दोन ते तीन आठवडे पाणी देण्याचे बंद करावे व त्यानंतर खताच्या मात्रा व हलकी भरणी करून पूर्ववत पाणी द्यावे. त्यायोगे

खोडवा पिकाची वाढ जोमदार होऊन मूळ पिकाच्या दिडपट उत्पादन मिळते.

**फुलांची कापणी, प्रतवारी व विक्री :** गुलछडीच्या तुऱ्यातील काही फुले उमलल्यानंतर लांब दांड्यासहीत कापणी करण्यात येते. मोकळ्या फुलांची विक्री करावयाची झाल्यास सकाळी फुले गोळा करण्यात येतात. गुलछडीचे तुरे केळीच्या पानात किंवा कागदात व्यवस्थीत गुंडाळून विक्रीसाठी पाठवण्यात येतात.

कंदाची कापणी : हिवाळ्यात फुलांची कापणी झाल्यानंतर कंद तयार होण्यास सुरवात होते. यावेळी पाणी तोडून जमीन सुकण्यास द्यावी. यावेळी पाने वाळून कंद सुप्तावस्थेत जातात, असे कंद खणून, वेगळे करून बियाणे म्हणून पुढील हंगामासाठी वापरता येतात.

# ग्लॅडीओलस

उंच, सरळ पुष्पदंड आणि विविध रंगांच्या जाती यामुळे "ग्लॅडीओलस" हे एक पुष्पगुच्छ व "कट फ्लॉवर" या श्रेणीतले अत्यंत महत्वाचे फुल असून भूमीगत कंदापासून याची लागवड करतात.



**अभिवृध्दी व लागवड :** या पिकाची लागवड सहा सें. मी. व्यासाच्या चपट्या गोलाकार कंदापासून करतात. लागवड करण्याआधी हे कंद कार्बेंडाझीम या बुरशीनाशकाच्या द्रावणात बुडवून कोरड्या जागी ठेवण्यात येतात. पाण्याचा व्यवस्थीत निचरा होणाऱ्या, मध्यम, हलक्या, सहा ते सात सामू असलेल्या जमिनीत या पिकाची वाढ चांगली होते.

थंड हवामान या पिकाला मानवते. सपाट किंवा गादी वाफ्यावर ऑगस्ट, सप्टेंबर या महिन्यात कंदांची लागवड करण्यात येते. क्षारयुक्त जमिनीत किंवा सावलीत या फुलझाडाची वाढ नीट होत नाही. या पिकाच्या लागवडीसाठी दोन ओळीतील अंतर ३० सें. मी. तर दोन झाडांतील अंतर २० सें. मी. ठेऊन १० सें. मी. खोलीवर कंदांची लावण करण्यात येते. लावण केल्यानंतर पाणी योग्य प्रमाणात देणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी जास्त झाल्यास कंद कुजून उगवणीवर परिणाम होतो. व्यापारी तत्त्वावर लागवड करायची झाल्यास ठराविक कालांतराने सातत्याने कंदाची लावण करणे गरजेचे आहे. एक हजार वर्ग मिटर जमिनीसाठी सर्वसाधारणपणे १०,००० कंदांची गरज भासते.

**खताच्या मात्रा :** ग्लॅडीओलसच्या लागवडीसाठी प्रतिहेक्टरी ५० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट मातीत मिसळून घ्यावे. या पिकास ६० कि. नत्र, १५० कि. स्फुरद व १५० कि. पालाश यावर खतांची शिफारस करण्यात आली आहे. यापैकी संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीच्यावेळी व नत्र तीन हप्त्यात २,४ व ६ पाने फुटण्याच्या अवस्थेत द्यावे. खते घातल्यानंतर हलकी भरणी केल्यास झाडास योग्य तो आधार मिळतो.

**रोग व किडी :** या पिकावर आढळणाऱ्या फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी एन्डोसल्फान किंवा मोनोक्रोटोफॉस या किटकनाशकांची तर बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. पाण्याचा योग्य निचरा न झाल्यास कंद कुजु लागतात व झाड पिवळट पडून वाळून जाते ही ग्लॅडीओलस लागवडीतील मुख्य समस्या आहे.

**फुलांची काढणी :** लागवडीनंतर तापमान, कंदाचे आकारमान आणि जात या नुसार सर्वसाधारणपणे ६० ते ७५ दिवसात फुले तयार होण्यास सुरवात होते. सुरवातीची एक दोन फुले उमल्यानंतर पुष्पदंडाची कापणी करावी. फुले तोडल्यावर किमान महिनाभर तरी रोपे पाणी न देता तशीच राहू द्यावे. नंतर कंद उपटून सावलीत सुकवावे व काबेन्डाझीम सारख्या बुरशीनाशकाचा वापर करून शीतगृहात साठवावे. कंदाची चांगली प्रत मिळविण्यासाठी १०० लिटर पाण्यात २ कि. डाय अमोनिअम फॉस्फेट, २ कि. पॉटॅशियम सल्फेट मिसळून तसेच ३ ग्रॅम कॉपर ऑक्सी क्लोराईड प्रती एक लिटर पाण्यात मिसळून जमीन भिजवून घ्यावी. मुख्य कंदाला जोडून आलेले छोटे कंद वेगळे करून वाढू द्यावेत. यासाठी कंदाची गादीवाफ्यावर लावण करून ४ सें.मी. व्यास झाल्यानंतर फुलांच्या उत्पादनासाठी बियाणे म्हणून वापरता येतात. एक हॅक्टर ग्लॅडीओलस लागवडीपासून ७०,००० फुले तयार होतात.

## ऑर्किडस्

जगातील सर्वात सुंदर फुले म्हणून ज्यांची गणना होते ती ही विविध रंग रुपातील ऑर्किडसची फुले मन मोहून टाकतात. तापमान, सूर्यप्रकाश आणि सापेक्ष आद्रता या बाबतीत फार संवेदनाशिल असलेल्या या पिकांचे प्रखर सूर्यकिरणे उष्ण व थंड वारे या पासून संरक्षण करणे जरुरीचे आहे.



**अभिवृध्दी :** ऑर्किडस्‌ची अभिवृध्दी मूळांचे तुकडे, फुटवे किंवा बीयांपासून करण्यात येत असली तरी ऊती संवर्धन ही व्यापारी तत्वावर अवलंबण्यात येणारी खात्रीलायक पध्दत आहे. फेब्रुवारी ते मार्च दरम्यान या झाडाची विशेष वाढ होत असल्याने हा कालावधी अभिवृध्दीसाठी योग्य मानला जातो.

**लागवड :** ऑर्किडस्‌ची लागवड २०'' व्यासाच्या मातीच्या सच्छिद्र कुंड्यात करण्यात येते. यामध्ये माध्यम म्हणून विटांचे तुकडे, छोटे दगड आणि कोळसा १:१:१ ह्या प्रमाणात वापरण्यात येतात. जमिनीत लागवड करायची झाल्यास रेती, माती आणि कंस्पोस्ट समप्रमाणात वापरून माध्यम तयार करण्यात येते. मायक्रो स्प्रिंकलर्सद्वारा पाणी देण्याची व्यवस्था केल्यास आद्रता योग्य प्रमाणात राखण्यास मदत होते व पाण्याचा अपव्यय टाळता येतो.

**खताच्या मात्रा :** या पिकाला फवारणीतून अन्नघटकांचा पुरवठा करण्यात येतो. झाडाच्या वाढीच्या काळात दर पंधरा दिवसांनी २ टक्के नत्र, ०.५ टक्के स्फुरद व ०.५ टक्के पालाश फवारणीद्वारा देण्यात येते. खालील रासायनिक पदार्थ प्रति लिटर वापरून फवारणीसाठी द्रावण तयार करण्यात येते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | पॉटेशिअम नायट्रेट | — | ५८४ | मी. ग्रॅम |
| २) | अमोनिअम सल्फेट | — | ९८ | मी. ग्रॅम |
| ३) | मॅग्नेशिअम सल्फेट | — | ४५३ | मी. ग्रॅम |
| ४) | मोनो कॅल्शिअम फॉस्फेट | — | २२२ | मी. ग्रॅम |
| ५) | कॅल्शिअम सल्फेट | — | १०८० | मी. ग्रॅम |
| ६) | आर्यन सल्फेट | — | १०८० | मी. ग्रॅम |
| ७) | मॅंगनिज सल्फेट | — | ५६ | मी. ग्रॅम |

जिबरेलीक ॲसिड १.५ पीपीएम या प्रमाणात वापरल्यास फुले लवकर बहरतात.

**आंतर मशागत :** झाडांना दिवसातून २ ते ३ वेळा पाणी द्यावे. हवेतील आर्द्रता योग्य प्रमाणात राखून पाण्याच्या निचऱ्याची योग्य काळजी घेतल्यास झाडे व्यवस्थित वाढतात. बेनोमिल किंवा ताम्रयुक्त बुरशीनाशक वापरुन रोगांचा बंदोबस्त करता येतो. फुलकीडे, मुंग्याच्या बंदोबस्तासाठी मोनोक्रोटोफोस सारखे आंतरप्रवाही किटकनाशक वापरता येते.

**फुलांची काढणी :** पूर्णपणे विकसित झालेली फुले लांब देठासहीत तोडण्यात येतात. फुले झाडावरच राहू दिल्यास एक ते तीन महिने टिकतात तर तोडलेली फुले एक ते चार आठवडे ताजी राहू शकतात. आकार, रंग, पुष्पदंडावरील फुलांची संख्या यावरुन फुलांचा दर ठरविण्यात येतो. पुर्णपणे वाढलेल्या झाडापासून ५ ते ८ फुले प्रतिवर्ष मिळू शकतात. १००० वर्ग मीटर क्षेत्रातील लागवडीतून पाच हजार फुलांचे उत्पादन मिळू शकते.

# झेंडू

पावसाळ्याचे काही दिवस वगळता वर्षभर उपलब्ध असणारे सामान्य माणसाचे फुल म्हणजे झेंडू. दसरा, दिवाळीच्या सणासाठी या फुलाला विशेष मागणी असते. विशेषत: उन्हाळ्यात लग्नसराईत इतर फुलांचे भाव गगनाला भिडलेले असतात. तेव्हा झेंडूची फुले, हारतुरे व सजावटीसाठी मोठ्या प्रमाणात वापरली जातात. सध्या विविध प्रकारच्या व विविध रंगाच्या जाती लागवडीसाठी उपलब्ध आहेत. भाजीपाला व इतर पिकासोबत झेंडूचे मिश्र पिक घेतल्यास सुत्रकृमी व इतर किटकांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.



**लागवड :** झेंडुची लागवड बी वापरुन करण्यात येते. निवडलेल्या जातीचे बियाणें गादीवाफ्यावर पेरुन रोपं तयार केली जातात. एक ग्रॅम सरासरी ३५० ते ४०० बीया असतात आणि १००० वर्ग मी. क्षेत्रफळासाठी ५ ग्रॅम बीयाणाची गरज असते. २५–३० दिवसात रोपं पुनर्लागणीसाठी तयार होतात. आफ्रिकन मेरीगोल्ड, फ्रेंच मेरीगोल्ड, फ्रेंच हायब्रीड अशा संकरीत जातीपासून उत्तम दर्जाची फुले मिळू शकतात.

उंच जातीच्या झेंडुच्या रोपांची लागवड ६० X ६० सें. मी. तर बूटक्या जातीच्या रोपांची लागवड ३० X ३० सें. मी. अंतरावर करण्यात येते.

**खताच्या मात्रा :** सेंद्रीय घटकांचे भरपूर प्रमाण असलेल्या जमिनीत या पिकाची चांगल्या प्रकारे वाढ होते. यासाठी हेक्टरी २५ टन कंपोस्ट वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त रोप लागवडीच्यावेळी नत्र, स्फुरद, पालाश प्रत्येकी ५० कि. प्रती हेक्टर या प्रमाणात वापरण्यात यावे. आणि एक महिन्यानंतर अतिरिक्त ५० कि. नत्राचा हप्ता द्यावा.

**आंतर मशागत :** पुर्नलागवडीनंतर साधारण आठवड्याभरात रोपं मूळ धरुन स्थापीत होतात. एका महिन्यानंतर रोपांचे वाढणारे टोक कापून टाकल्यास फुलाचे उत्पादन जास्त मिळते. याचवेळी नत्राचा दुसरा हप्ता देऊन हलकी भरणी केल्यास रोपे जोमाने वाढतात. उन्हाळ्यात गरजेनुसार पाण्याच्या पाळ्या देण्यात याव्या.

**किडी व रोग :** एन्डोसल्फन ३ मी. ली. किंवा मॅलोथिऑन २ मी. ली. प्रती लिटर पाण्यातून फवारल्यास पाने कुडतरणाऱ्या अळ्यांचा बंदोबस्त होतो. पानावरील काळ्या ठिपक्यांच्या नियंत्रणासाठी डायथेन एम –४५ या बुरशीनाशकाची फवारणी करावी.

**तोडणी :** लागवडीनंतर ५० दिवसांत फुले येण्यास सुरवात होते. ह्यानंतर साधारणपणे ३० दिवस फुलांची तोडणी करता येते. प्लॅस्टीकच्या पिशव्यात बंद करून थंड जागी ठेवल्यास झेंडूची फुले आठ दिवस पर्यंत ताजी राहू शकतात. एक हेक्टरी जमिनीतून दहा टनापर्यंत फुलांचे उत्पादन घेता येते.

## अबोली

अबोलीच्या फुलांचा उपयोग मुख्यत्वे करुन हार, गजरे व वेण्यासाठी करण्यात येतो. लाल, नारंगी व पिवळ्या रंगाची ही फुले लक्ष वेधून घेतात.

सदापर्णी, दीड मीटर उंचीपर्यंत वाढणाऱ्या झुडपाच्या शेंड्यावर फार आकर्षक फुले येतात.

**जमिन व हवामान :** अबोलीची झाडे उष्ण, दमट हवामानात फार चांगल्याप्रकारे वाढतात. मात्र अती थंड हवामान या झाडास मानवत नाही. पाण्याचा निचरा होणारी, ६ ते ७ दरम्यान सामू असलेली जमीन या पिकाला मानवते.

**अभिवृध्दी आणि लागवड :** अबोलीची लागवड, बियाणे किंवा फांद्या वापरून करण्यात येते. फुले तयार झाल्यानंतर निदान दोन महिनेतरी फुलांचे शेंडे वाळू द्यावेत व बीया काढाव्यात. गादीवाफ्यावर बीयांची पेरणी करून ८ ते १० पाने तयार झाल्यावर रोपांची पुर्न:लागण करावी. साधारणपणे पावसाळ्यात अबोलीची लागवड करण्यात येते. एकदा लागवड केल्यानंतर सुरवातीची १–२ वर्षे फुलांचे भरपूर उत्पन्न मिळते व पुढेपुढे उत्पन्नात घट होत जाते.



हेक्टरी २५ टन शेणखत किंवा कंस्पोट वापरून सरी वरंबा पध्दतीने ३० सें. मी. अंतरावर वरंबाच्या बाजूने रोपांची लावण करण्यात येते.

**खताच्या मात्रा :** लागवडीच्यावेळी ३०:६०:६० या प्रमाणात नत्र, स्फूरद व पालाश सरीत मिसळून घ्यावे व ३० कि. नत्र दोन हप्त्यात विभागून द्यावे ज्यायोगे पिकांची वर्षभराची अन्नद्रव्याची गरज भागवता येते.

**किड व रोग :** या पिकाचा मुख्य शत्रु म्हणजे सुत्रकृमी. कार्बोफुरान या किटकनाशकाचा ३० ग्रॅम प्रती वर्गमीटर या प्रमाणात वापर केल्यास सुत्रकृमीचा बंदोवस्त होऊ शकतो. इतर किडी व रोगांच्या बंदोबस्तासाठी मोनोक्रोटोफॉस किंवा ताम्रयुक्त बुरशीनाशकाचा वापर करण्यात यावा.

**फुलांची काढणी :** अबोलीची फुले पूर्णपणे उमलल्यानंतर काढण्यात येतात. उमललेली फुले झाडावर राहू दिल्यास ३ ते ४ दिवस टिकतात तर गोळा केलेली फुले ३६ ते ४८ तासांत कोमेजू लागतात. लागवडीनंतर चार महिन्यात फुले येण्यास तयार होतात आणि एक हेक्टर लागवडीपासून ५०० ते ७०० किलो फुलांचे उत्पादन मिळू शकते.

**शासकीय सहाय्य :** फुलशेतीसंबंधी अधिक तांत्रिक माहिती व शासकीय अर्थसहाय्यासाठी खालील विभागीय कृषी कार्यालयांशी संपर्क साधावा.

फोन नं. :–

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पेडणे | – २२९१२९१ | म्हापसा | – २२६२३६८ | मडगांव | – २७१५००५ |
| डिचोली | – २३६२१२८ | तिसवाडी | – २२८६१२९ | केपें | – २६६२११६ |
| वाळपई | – २३७४२४६ | फोंडा | – २३१२११९ | सांगे | – २६०४२५३ |
| काणकोण | – २६४३०६६ | | | | |

प्रकाशक :

# शेतकी संचालनालय

करंजाळे—गोवा

फोन नं. : २४६५४४३ / २४६५४४६ / २४६५८४०
फॅक्स : ०८३२-२४६५४४१
इ—मेल : agrigoa@goa.nic.in

Printed at the Government Printing Press, Panaji-Goa – 843/1500 – 9/2009